आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, २ रा मजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.
Email: excise_jtcom_molasessalcohol@mahaonline.com, Tel no.०२२-२२६६ ३६८५

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी (मार्फत-संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क)
२. सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,

क्र. मळी ११२०१४/अंदाजपत्रक/२७/५-अ — मुंबई, दि. २९ जून, २०२०

विषय :- सन २०१९-२० या मळी हंगामातील उत्पादित मळीच्या परराज्यात / परदेशात निर्यातीवरील बंदी उठविण्याबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक एमपीएल-०११९/प्र.क्र.०७/राउशु-३ दिनांक २९.६.२०२०

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयानुसार सन २०१९-२० या मळी हंगामातील उत्पदित मळीच्या पराराज्यात/ परदेशात निर्यातीवर दिनांक २७.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ३०.९.२०२० पर्यत घालण्यात आलेली बंदी संदर्भीय आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ प्रभावाने उठविण्यात आली आहे. तसेच मळी निर्यातीच्या परवानगीवर केंद्रीयरित्या नियंत्रण ठेवण्यासाठी परराज्यात/ परदेशात मळी निर्यातीची परवानगी देण्याचे अधिकार आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) परराज्यात/ परदेशात मळी निर्यातीची परवानगी केंद्रीयरित्या आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या स्तरावर असल्याने यापुढे या कार्यालयाच्या पुर्व परवानगी शिवाय मळी निर्यातीस परवानगी जिल्हाधिकारी/ अधीक्षक स्तरावरुन देण्यात येऊ नये.

२) मळीची परराज्यात / परदेशात निर्यात करण्यास संबंधित घटकांनी खाली नमूद बाबींची पूर्तता केल्यानंतर प्रत्येक अर्जदार निर्यातदार घटकास त्यांना सुनिश्चित परिमाणाची मळी निर्यात करण्यास या कार्यालयाकडून मान्यता देण्यात येईल. त्या अनुषंगाने निर्यातदार घटकांनी अर्ज केल्यास खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**अ) परदेशातील निर्यातीकरिता आवश्यक बाबी :-**

१. मान्यताप्राप्त निर्यात घटक असल्याबाबतचे प्रमाणपत्र ( रजिस्टर्ड एक्सपोर्ट हाऊस )
२. विदेशी आयातदार यांच्याबरोबर केलेले आयातीबाबतचे ऑडर्स व करारपत्र
३. राष्ट्रीयकृत किंवा इतर बँकामार्फत निर्यात करण्याबाबतचे मान्यता दिलेले क्रेडिट किंवा तत्सम पत्र.

४. राज्यातील ज्या बंदरातून मळीची निर्यात करावयाची आहे त्या ठिकाणचे निर्यात व्यवस्था व विधी ग्राहय एम-३ अनुज्ञप्ती.

५. घटक प्रथम निर्यात करीत नसल्यास मागील पाच वर्षाचा निर्यातीबाबतचा तपशील.

६. जीएमपी (GMP) प्रमाणपत्र, जेणेकरुन निर्यातीबाबतचा दर्जा दर्शविला जातो.

७. परिवहन परवाना मंजूर करतांना संबंधित साखर कारखान्यांकडून नेहमी होणाऱ्या मळीचे विश्लेषण अहवाल प्राप्त करुन प्रत्येक परवान्यावर निर्यात केल्या जाणाऱ्या मळीचा टीआरएस नमुद करण्यात यावा.

८. नियमानुसार योग्य ते प्रशासकीय शुल्क भरणे बंधनकारक राहील.

९. कोणत्याही परिस्थितीत परदेशातील निर्यात ही केवळ राज्यातील बंदरातूनच करावी लागेल.

**ब ) परराज्यातील निर्यातीकरिता आवश्यक बाबी :-**

१. संबंधित राज्याच्या अबकारी विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र.

२. संबंधीत राज्यात घटकास मळी बाळगणे/ वापरणेकरिता मंजूर असलेली विधीग्राहय अनुज्ञप्तीची प्रत.

३. महाराष्ट्र राज्यातील संबंधित साखर कारखान्याने दिलेले संमतीपत्र /सेल ऑर्डर

३) या कार्यालयाकडून वरीलप्रमाणे संबंधित घटकास परवानगी दिल्यानंतर अधीक्षक स्तरावरुन परराज्यातील निर्यातीस अनुज्ञप्ती नमुना "एम-५" मंजूर करताना मुंबई मळी नियम, १९५५ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

४) तसेच शासन आदेश क्र. एमएलएस १९९५/५/इक्ससी-२ दि. ०६.१२.१९९६ व या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एमएलएस २१२०००/४२४१३/२१८/५-अ दि. १६.११.२००० मधील सूचनांनुसार मळीच्या निर्यातीबाबत किंवा बंदरातील एम-३ अनुज्ञप्ती पर्यंतच्या वाहतुकीबाबत सर्व आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

तरी उपरोक्त आपल्या अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांच्या व सर्व संबधित अनुज्ञप्तीधारकांच्या निदर्शनास आणून पुढील योग्य ती कार्यवाही करावी. सर्व अधीक्षकांनी सदर पत्राची पोच द्यावी.

( कांतीलाल उमाप )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य मुंबई

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता

१. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
२. मा.आयुक्तांचे स्वीय सचिव
३. या कार्यालयातील सर्व कार्यासने
४. अभिलेख शाखा